# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक ९ जुलै, २०२६

## (सकाळी ०९-३० ते १०-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक - १)**

(१) **सर्वश्री रामदास मसराम, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, अमिन पटेल, अस्लम शेख, डॉ. ज्योती गायकवाड, श्री.साजिद पठाण, डॉ.विश्वजित कदम, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री अमित विलासराव देशमुख, अमित झनक, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात आदिवासी बांधवांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या “धरती आबा भगवान बिरसा मुंडा” योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विहिरींच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास येणे, अनेक लाभार्थ्यांच्या नावाने विहिरी मंजूर करून प्रत्यक्षात काम न करता अथवा अपूर्ण काम करून शासनाचा निधी काढण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, पोंगणवाणी येथील लाभार्थी शंकर मडावी तसेच बेलगाव परिसरातील काही प्रकरणांमध्ये काम अपूर्ण असतानाही निधीची संपूर्ण उचल झाल्याचे समोर आले असणे, त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार व संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा प्रकारचे गैरव्यवहार होऊ नयेत यासाठी प्रभावी नियंत्रण यंत्रणा उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(२) **श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या इमारतींच्या बांधकामांना नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सुनावणीच्या नोटीसा देण्याची प्रक्रिया सुरु केली असणे, तसेच ज्या भागामध्ये या नोटीसा देण्यात येत आहेत तेथील अनेक घरे ही ७० ते ८० वर्षापूर्वीची शासनाने मालमत्तापत्रक दिलेल्या

स्थानिक प्रकल्पग्रस्तांची घरे असणे, ज्या भूमिपुत्रांनी नवी मुंबई वसविण्याकरीता जागा दिल्या त्याच स्थानिक प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांना सुनावणी नोटीसा बजावल्या असणे, सदरच्या बजावण्यात आलेल्या सुनावणीच्या नोटीसांबाबत स्थानिक प्रकल्पग्रस्तांमध्ये भीती आणि तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या इमारतीच्या बांधकामांना नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत दिलेल्या सुनावणीच्या नोटीसांना स्थगिती देणेबाबत शासनस्तरावर योग्य तो मार्ग काढण्याची आवश्यकता, नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांचा विचार करून स्थानिक प्रकल्पग्रस्तांची घरे सुरक्षित राहावित याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**(३) श्री.सिध्दार्थ खरात, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू असणे, पुणे-नाशिक, मुंबई-पुणे तसेच पुणे-बंगळुरू उच्चगती रेल्वे मार्गांच्या विविध स्तरांवर चर्चा व नियोजन सुरू असणे, मात्र विदर्भाची राजधानी नागपूर ही राज्याची उपराजधानी असूनही ती मुंबई तसेच राज्यातील इतर प्रमुख आर्थिक, औद्योगिक व शैक्षणिक केंद्रांशी उच्चगती रेल्वे सुविधेने जोडलेली नसणे, नागपूर हे देशाच्या भौगोलिक केंद्रस्थानी असून बहुआयामी मालवाहतूक केंद्र (MIHAN), औद्योगिक गुंतवणूक, माहिती तंत्रज्ञान, संरक्षण उद्योग, पर्यटन व शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने झपाट्याने विकसित होत असणे, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गामुळे राज्यातील आर्थिक एकात्मतेस चालना मिळाली असली तरी दीर्घकालीन विकासासाठी उच्चगती रेल्वे वाहतूक व्यवस्था आवश्यक असणे, नागपूर-मुंबई बुलेट ट्रेन अथवा हायस्पीड रेल्वे मार्ग उभारल्यास विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्र यांमधील दळणवळण अधिक वेगवान होऊन गुंतवणूक व रोजगारनिर्मितीस चालना मिळून राज्याचा संतुलित प्रादेशिक विकास साधण्यास मदत होणार असणे, त्यामुळे शासनाने नागपूर-मुंबई बुलेट ट्रेन / हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर बाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची तसेच या प्रकल्पाचा प्राथमिक व्यवहार्यता अहवाल (Pre-Feasibility Study) तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री.नरेंद्र मेहता, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"बीएसयूपी योजनेअंतर्गत मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजी काशी येथील सर्वे क्रमांक ९०,९४,१०७/१ व मौजे मीरा येथील सर्वे क्रमांक ७८,८० एकूण ८१,६८६.९१३ चौरस मीटर क्षेत्रावर शासकीय जागेवर बीएसयूपी योजना मंजूर करण्यात येणे,यापैकी सद्य:स्थितीत ४१३६ पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचे वाटप पूर्ण झाले असून त्यापैकी १९७६ लाभार्थ्यांचे पुनर्वसन रखडलेले असणे,सद्य:स्थितीत सदर प्रकल्पास केंद्र व राज्य शासनाचे अनुदान बंद झाल्याने

बीएसयूपी प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या बंद झाला असणे,सध्या सुरू असलेले काही इमारतीचे बांधकाम महापालिकेच्या निधीतून व एमएमआरडीएकडून घेतलेल्या कर्जातून केले जात असणे, यामुळे महापालिकेवर प्रचंड आर्थिक भार पडत असणे, यावर उपाय म्हणून उर्वरित १९७६ झोपडपट्टी धारकांना सदनिकांचे बांधकाम करण्याकरता पीपीपी तत्त्वावर बांधकाम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला असून तो प्रलंबित असणे, नवीन यूडीपीसीआर अन्वये एफएसआय मध्ये वाढ झाल्याने प्रत्यक्षात पीपीपी तत्त्वावर सदरच्या सदनिकांचे बांधकाम करणे महापालिकेस आधिक सोयीचे ठरणार असणे, यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक बोजा कमी होऊन प्रत्यक्षात लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होऊन महापालिकेच्या महसूली उत्पन्नात देखील वाढ होणार असणे, याकरता सदरील जागा शासकीय असल्याने महसूल विभागाकडे सदर जागेवर पीपीपी तत्त्वावर इमारत बांधण्यास परवानगी मागितलेली असणे, यावर शासनाने सदर जमिनीवर पीपीपी तत्त्वावर बीएसयुपी योजनेअंतर्गत सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी द्यावयाची परवानगी व करावयाची कार्यवाही."

**(५) श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती अंतर्गत व अमरावती शहरातील अन्यत्र कार्यान्वित असलेल्या शालेय शिक्षण विभागाच्या विविध कार्यालयांकरिता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,अमरावती यांच्या परिसरातील खुल्या जागेवर 'डॉ.पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुल' उभारणीसाठी नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत शासनाने सूचना दिलेल्या असणे, त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी जागेची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक नकाशे व अंदाजपत्रक तयार करून दिलेले असणे, यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे मार्च, २०२६ चे अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषणा केलेली असणे, अमरावती येथे डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या नावाने या भव्य शैक्षणिक संकुलाची उभारणी करण्यासाठी साधारण रु.९०.४७ कोटी इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध होणेकरीता कार्यवाही सुरु असणे, मात्र अद्याप प्रशासकीय मंजुरी व निधीची उपलब्धता न झाल्यामुळे प्रत्यक्ष कामास विलंब होत असणे, या दिरंगाईमुळे शालेय शिक्षण विभागाच्या मध्यवर्ती प्रशासकीय सुविधेपासून अमरावती विभागातील नागरिक व विद्यार्थी वंचित राहिले असल्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेली तीव्र नाराजी, परिणामी या महत्त्वपूर्ण शैक्षणिक संकुलाच्या बांधकामासाठी रु. ९०.४७ कोटींच्या प्रस्तावाला तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरित करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) श्री.आमश्या पाडवी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभागामार्फत ज्या अनुदानित आश्रमशाळांवर प्रशासकाची नेमणूक पाच वर्षापेक्षा अधिक काळ चालू आहे अशा शाळा बंद करण्याचे निर्देश देण्यात येणे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ, धडगाव यांच्या सुरगस, मांडवा, रायसिंगपूर, गोरंबा, बिलगाव, राजवाडी आणि माकडकुंड या सात अनुदानित आश्रमशाळांवर दिनांक १७ जुलै, २०१८ पासून प्रशासक नेमण्यात आलेला असून पाच वर्षापेक्षा अधिक कालावधी उलटूनही संस्थेच्या अध्यक्षपदासंदर्भात कोणताही अंतिम प्रशासकीय निर्णय न झाल्याने शाळांचे नियमित शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज पूर्णपणे विस्कळीत होणे, या शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य, गणवेश वितरणातील विलंब, भोजनाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी, पिण्याच्या पाण्याची कमतरता, स्नानगृह-स्वच्छतागृहांचा अभाव, सुरक्षा भिंती व वसतिगृहांच्या सुविधांचा अभाव यांसारख्या निर्माण होणाऱ्या समस्या, दीर्घकाळ प्रशासकत्व चालू राहिल्याने संस्थेची कार्यक्षमता घटत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, अशा परिस्थितीत शासनाने चौकशी पूर्ण करून संस्थेबाबत अंतिम निर्णय घेऊन संस्थेची मान्यता रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्री.हेमंत रासने, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील मावळ, खेड आणि पनवेल परिसरामध्ये केमिकल, कृत्रिम रंग व फ्लेवरचा वापर करून मानवी आरोग्याला घातक असा बनावट आंबा रस (मँगो पल्प) तयार करून विकणारे आंतरजिल्हा रॅकेट सक्रिय असणे, यासंदर्भात 'रक्षक प्रतिष्ठान' व इतर सामाजिक संस्थांनी अन्न व औषधे प्रशासन कार्यालयाकडे लेखी तक्रारी व पुरावे देऊनही केवळ नाममात्र कारवाई करण्यात आली असणे, या बेकायदेशीर व्यवसायातून मुख्य आरोपी अक्रम, अब्दुल आणि सद्दाम या मुख्य सूत्रधारांनी मुंबई, पुणे व ठाणे परिसरात अंदाजे १५ कोटी रुपयांचा बनावट रस विकून कोट्यवधींची अवैध उलाढाल केली असणे, मात्र सदर मुख्य आरोपींवर अद्याप कोणतीही कठोर कारवाई झालेली नसणे, उलट पनवेल व पुण्याचे अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी आर्थिक फायद्यासाठी या रॅकेटला पाठीशी घालत असल्याचे स्पष्ट दिसत असणे, त्यामुळे सदर मुख्य आरोपींवर तातडीने फौजदारी कारवाई करून त्यांना अटक करणे आवश्यक असणे, तसेच या रॅकेटला अभय देणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून त्यांची उच्चस्तरीय चौकशी करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री.चंद्रकांत नवघरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक १३ मे, २०२४ रोजी नियामक मंडळ गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ संभाजीनगर येथे ८२ वी बैठक महामंडळाने घेतली असणे, सदर बैठकीत बसमत (जि.हिंगोली) मतदारसंघाचे विधानसभा सदस्य यांनी पुर्णा प्रकल्प, बसमत येथील २७ एकर जागेपैकी १० एकर जागा विविध शासकीय कार्यालयाचे बांधकामासाठी देण्यात येऊन त्यातील जमिनीपैकी १.६० आर (४ एकर) जमीन सामाजिकन्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मौजे वसमत येथे कार्यरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृह जमीन खरेदीसाठी मुल्यांकन मिळणेबाबत आयुक्त समाज कल्याण, पुणे व जलसंपदा विभागाकडे जिल्हाधिकारी यांनी दिनांक २२ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आलेले असणे, सदर जमिनीचे शासकीय मुल्यांकन (शेतीची किंमत) रक्कम रुपये ९,६६,३७,५००/- इतकी असून नोंदणी शुल्क व इतर खर्च अंदाजे रक्कम रुपये ९,९८,०००/- एवढा येत असल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्यानुसार सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जि.हिंगोली सदर (४ एकर) जमीन मिळणेसाठी विनंती केलेली असून त्याबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांमुलींचे शासकीय वसतिगृह वसमत ता.वसमत, जि.हिंगोली या दोन वसतिगृहासाठी १.६० आर. जमीन खरेदीसाठी शासनाने मंजुरी प्रदान करुन रक्कम रुपये ९,७६,३५,५०० (रुपये नऊ कोटी शहात्तर लाख पस्तीस हजार पाचशे रुपये केवळ) एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात यावी जेणेकरुन सदर जमीन खरेदीसाठी/हस्तांतरणासाठी सोईचे होईल अशी मागणी शासनाकडे करण्यात आलेली असणे, तसा प्रस्ताव शासनाकडे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित असणे, याप्रकरणी तातडीने निर्णय घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.

**(९) श्री.रत्नाकर गुट्टे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"परभणी जिल्ह्यातील गंगाखेड विधानसभा क्षेत्रातील मौजे. धानोरा काळे, ता. पुर्णा येथील गोदावरी नदीवरील पुलाचे बांधकाम सन २०२१ पासून सुरू असून जवळपास ९८% काम पूर्ण झालेले असणे, सदरील पुलाच्या दोन्ही बाजुच्या भरावाचे काम अपुर्ण असल्याने पुलाचे बांधकाम पुर्ण होऊनही पुल रहदारीकरीता सुरु न होणे, यामुळे नागरीकांची पावसाळयात प्रचंड गैरसोय होत असुन डिग्रस उच्च पातळी बंधा-याचे पाणी पुर्ण क्षमतेने साठवता येत नसल्याने शेतक-यांचेही मोठे नुकसान होत असणे, तसेच मौजे.वझुर, ता.पुर्णा येथील गोदावरी नदीवरील पुलाचे बांधकाम सन २०२१ पासून सुरू असुन सदरील पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी देण्यात आलेली मुदत संपलेली असणे, तथापि या पुलाचे बांधकाम अद्याप अर्धवट अवस्थेत असणे, सदर पूलाचे काम तात्काळ मार्गी लावणे गरजेचे असणे, शासनाचा कोटयवधी रूपयांचा निधी खर्च करुन सर्वसामान्यांसाठी

महत्वाची ठरणारी कामे वेळेत मार्गी लागत नसणे, सदरहू बाब अत्यंत चिंताजनक व गंभीर असणे, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन मौजे धानोरा काळे आणि मौजे.वझुर, ता.पुर्णा येथील गोदावरी नदीवरील दोन्ही पुलांचे उर्वरीत काम तात्काळ पूर्ण करण्याची तसेच पूलाची कामे संथगतीने करणा-या संबंधित दोषी ठेकेदार व अधिका-यांवर कारवाई करण्याची आवश्यता, शासनाने याबाबत केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **श्री.अनिल पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमळनेर येथील सा.बा.कार्यकारी अभियंता श्री.सुभाष राऊत यांच्या मनमानी, दबावतंत्र, मानसिक त्रासामुळे कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी दि.२४/४/२०२६ रोजी सामूहिक बेमुदत रजेवर जाण्याचा निर्णय घेणे, सदर अधिकारी मार्च, २०२५ पासून अमळनेर येथे कार्यरत असले तरी ते मुख्यालयी वास्तव्यास नसून जळगाव येथून कामकाज पाहत असल्यामुळे दैनंदिन प्रशासकीय व तांत्रिक कामकाजावर, गुणवत्तेवर आणि तक्रार निवारणावर अत्यंत गंभीर व प्रतिकूल परिणाम होत असणे, अमळनेर येथे शासकीय निवासस्थान प्राप्त असतानाही त्याचा वापर न करता संबंधित अधिकाऱ्यांनी घरभाडे भत्ता (HRA) घेतलेला असणे. याशिवाय शासकीय वाहनाचा वापर वाढून शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होणे, या गंभीर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२९/४/२०२६ रोजी मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम व शासनाकडे लेखी तक्रार करणे, शासनाने दि.०८/६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना १८ अभियंत्यांचे म्हणणे व जबाब विचारात घेऊन आणि श्री. राऊत यांचा खुलासा प्राप्त करून सुस्पष्ट निष्कर्षासह अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याचे निर्देश दिलेले असणे, परंतु अद्यापही यावर ठोस कार्यवाही न होणे, यामुळे अधिनस्त अभियंत्यांचे मनोबल खचणे, या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करून, तसेच दोषी अधिकाऱ्यावर त्वरित कठोर शिस्तभंगाची कारवाई करून विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(सकाळी ११-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **महसूल मंत्री** : "इंद्रायणी विद्यामंदिर, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे येथील अवैध बांधकामाबाबत." या विषयावरील श्री.सुनिल शेळके, वि.स.स. यांच्या दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(क)** डी.वाय.पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** संजीवनी विद्यापीठ, कोपरगाव, जि. अहिल्यानगर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** प्रवेश नियामक प्राधिकरण (राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षासह) यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३)** **उद्योग मंत्री** : **(क)** विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** कोकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे सन २०२५-२०२६ व सन २०२६-२०२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक आणि सन २०२४-२०२५ व सन २०२५-२०२६ या वर्षांचे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सभागृहासमोर ठेवतील.

(४) **सांस्कृतिक कार्य मंत्री** : "हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाड्याचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे." या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६० - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (तिसरी सुधारणा**)** विधेयक, २०२६

(२) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा**)** विधेयक, २०२६

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा**)** विधेयक, २०२६

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६० - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

---

**(२) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६**

---

**(३) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६**

सहा : **(बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री सुनिल प्रभू, रोहित पवार, अमिन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षीरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहूल पाटील, श्री. रोहित पाटील डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनील राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्रविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील विद्यमान सरकार जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर पूर्णपणे अपयशी ठरले असून विकासाचे दावे केले जात असताना प्रत्यक्षात सर्वसामान्य नागरिकांना रोजच्या जीवनात गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असणे, राज्यात महावितरणचा कारभार पूर्णपणे कोलमडला असून ग्रामीण भागात कोणतीही पूर्वकल्पना न देता ८ ते १० तास अघोषित लोडशेडिंग केली जाणे, वाढीव आणि चुकीची वीज बिले देऊन सर्वसामान्यांची लूट सुरू असणे, ट्रान्सफॉर्मर (डीपी) जळाल्यास तो बदलून मिळण्यासाठी शेतकऱ्यांना महिनाभर ताटकळत राहावे लागणे, पूर्वसूचनेशिवाय आणि विश्वासात न घेता 'स्मार्ट मीटर' सक्तीने लावण्यात येणे, या स्मार्ट मीटरमुळे वीज बिल दुप्पट-तिप्पट येत असून, रिचार्ज संपताच वीज खंडित होत असणे, नियोजनाचा अभाव असलेल्या शहरीकरणामुळे महानगरे आणि नगरपालिका क्षेत्रांचे रूपांतर कचराकुंडीत झाले असणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये करोडो रुपयांचा होत असलेला गैरव्यवहार, बोरीवली नगर भूमापन ६४२ च्या ठिकाणी नगर भूमापन अधिकारी यांना हाताशी धरुन चुकीचा नकाशा तयार करणे आणि एफएसआय वाढवून विकासकास २०० कोटी रुपयांचा फायदा करुन देणे, दिडोंशी येथील पद्मावती नगर

येथे सन २०१२ पासून विकासकाने पुनर्वसन न करता ८० घरमालकांना बेघर करणे, मिरा-भाईंदरमधील लोकप्रतिनिधींनी अधिकारांचा दुरुपयोग करुन अनधिकृत बांधकाम करणे, मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये टीडीआर नियमावलीत बेकायदेशीर बदल करून ठराविक बिल्डरांना हजारो कोटींचा फायदा देण्यात येणे, धारावी पुनर्वसन प्रकल्पात स्थानिक रहिवासी, छोटे उद्योजक आणि कष्टकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान सुरू असून अपात्रतेच्या नावाखाली हजारो गोर-गरिबांना मुंबईबाहेर हाकलण्याचा प्रयत्न सुरु असणे, कुर्ला, मुलुंड आणि मुंबईतील इतर मोक्याच्या शासकीय जमिनी प्रकल्पांच्या नावाखाली विकासकांच्या ताब्यात दिल्या जात असणे, रस्त्यांच्या विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च दाखवला जात असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आणि निष्कृष्ट दर्जाची झालेली असणे, मुंबई-गोवा महामार्गाच्या संपूर्ण चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वास न गेल्याने कोकणातील पर्यटनावर झालेला परिणाम, मुंबई-गोवा महामार्गासह सागरी महामार्गाचे काम अपूर्ण असताना शासनाने मुंबई ते गोवा ग्रीनफिल्ड हायवेची घोषणा करूनही गेल्या ३ वर्षात त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, मोक्याचे आणि कोट्यवधी रुपये किमतीचे शासकीय भूखंड कवडीमोलाने मर्जीतील संस्था आणि उद्योगपतींना बहाल करण्यात येणे, गरिबांच्या घरांसाठी आणि सार्वजनिक सुविधांसाठी राखीव असलेल्या जमिनींची खुली लूट सुरु असणे, राज्यात विशेषत: बीड आणि सांगली जिल्ह्यातील हिंदू देवस्थान इनाम व वक्फ जमिनींच्या प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झालेला असणे, या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी वारंवार लोकप्रतिनिधींकडून करण्यात येणे, मौजे चिंचपूर तालुका आष्टी, जिल्हा बीड येथील इनाम दर्गाह जमीन हस्तांतरण प्रकरण महसूल विभागाने जाणीवपूर्वक पुनर्निरीक्षणातून वगळले असणे, देवस्थान जमिनी घोटाळ्यांवर अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, मीरा भाईंदर तसेच येऊर जिल्हा ठाणे येथील आदिवासी जमिनींचा गैरव्यवहार, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, सरकारची परवानगी न घेता आदिवासींच्या जमीनी हडप करणे, भिवंडी येथील भूमी वर्ल्ड या विकासकाने शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शॉपिंग मॉल उभारणे, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, महाराष्ट्रात वारंवार उघडकीस येत असलेले विविध प्रकारचे जमीन घोटाळे त्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही."

**सात : (बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री रमेश बोरनारे, दिलीप वळसे-पाटील, प्रशांत बंब, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, सिध्दार्थ शिरोळे, अर्जुन खोतकर, चेतन तुपे, योगेश सागर, दिपक केसरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्री. अमल महाडिक, डॉ. तानाजी सावंत, सर्वश्री अनिल पाटील, रणधीर सावरकर, राजेंद्र गावित, राजकुमार बडोले, सुधीर मुनगंटीवार, विजय शिवतारे, धर्मरावबाबा आत्राम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री राजेश क्षिरसागर, संजय बनसोडे, रविंद्र चव्हाण, प्रदिप जैस्वाल, श्रीमती सुलभा खोडके, श्री.अमित साटम, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शेखर निकम, संजय उपाध्याय, विलास तरे, प्रतापराव पाटील-चिखलीकर, सत्यजित देशमुख, चंद्रदीप नरके, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री संजय केळकर, नरेंद्र भोंडेकर, दिलीप बनकर,**

**सुभाष देशमुख, मंगेश कुडाळकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री विक्रम पाचपुते, किशोर पाटील, राजेश विटेकर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री शांताराम मोरे, सुनिल शेळके, डॉ. राहूल आहेर, सर्वश्री प्रकाश सुर्वे, चंद्रकांत नवघरे, अतुल भातखळकर, निलेश राणे, काशिनाथ दाते, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री तुकाराम काते, सचिन पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री अशोक पाटील, मनोज कायंदे, मिहीर कोटेचा, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री नारायण कुचे, बालाजी कल्याणकर, शंकर मांडेकर, अभिमन्यु पवार, सुहास कांदे, राजू कारेमोरे, राजेश पवार, संजय गायकवाड, प्रशांत ठाकूर, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री किसन कथोरे, महेंद्र थोरवे, महेश बालदी, महेंद्र दळवी, संभाजी पाटील-निलंगेकर, चंद्रकांत पाटील, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री संतोष बांगर, महेश चौघुले, विश्वनाथ भोईर, राजन नाईक, दिलीप लांडे, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री महेश शिंदे, राम कदम, आमश्या पाडवी, कालिदास कोळंबकर, हिकमत उढाण, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, पराग शाह, अमोल खताळ, शिवाजी पाटील, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रत्नाकर गुट्टे, आनंद तिडके, मंगेश चव्हाण, मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, विजय देशमुख, सुहास बाबर, महेश लांडगे, विलास भुमरे, ॲड.राहूल कुल, सर्वश्री राजेश मोरे, सुनिल कांबळे, विठ्ठल लंघे, भिमराव तापकीर, किरण सामंत, शंकर जगताप, राजेंद्र यड्रावकर-पाटील, समाधान आवताडे, शरददादा सोनावणे, गोपिचंद पडळकर, डॉ.अशोकराव माने, श्री.सचिन कल्याण-शेट्टी, डॉ.अतुलबाबा भोसले, सर्वश्री देवेंद्र कोठे, हेमंत रासने, चैनसुख संचेती, श्रीमती श्वेता महाले, डॉ.संजय कुटे, सर्वश्री प्रताप अडसड, प्रविण दटके, प्रकाश भारसाकळे, हरिष पिंपळे, जितेश अंतापुरकर, राजू तोडसाम, सुमित वानखेडे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, प्रविण तायडे, मोहन मते, बंटी भांगडिया, समीर कुणावार, चरणसिंग ठाकूर, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किशोर जोरगेवार, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, करण देवतळे, सुरेश धस, संतोष दानवे, समीर मेघे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, नरेंद्र मेहता, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. दिलीप बोरसे, डॉ. सुरेश खाडे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमोल जावळे, काशिराम पावरा, राजेश पाडवी, मनोज घोरपडे, अक्षय कर्डिले, राहुल आवाडे, श्याम खोडे, राजेश वानखडे, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाले, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री देवराव भोंगळे, राणाजगजितसिंह पाटील, रवी राणा, डॉ.तुषार राठोड, सर्वश्री तानाजी मुटकुळे, कुमार आयलानी, रविशेठ पाटील, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री हरिश्चंद्र भोये, सुरेश भोळे, सुधीर गाडगीळ, श्रीमती सई डहाके, सर्वश्री केवलराम काळे, संजय पुराम, भीमराव केराम, श्रीमती अनुराधा चव्हाण, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"विद्यार्थी हे आपल्या देशाचे भवितव्य, राष्ट्राची संपत्ती व उद्याची उमेद आहे या विचाराने प्रेरित होऊन राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि कमी खर्चात उच्च शिक्षण उपलब्ध करण्याच्या दृष्टीने व शिक्षण हे जीवननिर्मित, मानवनिर्मित आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व निर्माण करणारे व्हावे यादृष्टीने देशाचे मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासनाने केलेल्या "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२०" या धोरणाची अंमलबजावणी

डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कार्यबल गटामार्फत राज्यात सुरु असणे, या धोरणाच्या अंमलबजावणीस गती देण्यासाठी आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सुकाणू समिती गठीत करण्यात आली असणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० अंतर्गत महाविद्यालयांना/विद्यापीठांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यबल गठीत केला असणे, सीईटीच्या माध्यमातून नवीन वेब पोर्टल विकसित करण्यात आले असणे, राज्यातील महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेली प्राचार्य व ग्रंथपाल इत्यादी २२३ पदे भरण्यास मान्यता दिली असणे, अभिमत विद्यापीठांकरिता शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्तीची योजना लागू करण्यात येणे, नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठातील सुविधांसाठी २५ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असणे, कोविड-१९ मुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत संपूर्ण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणात्मक बदल करण्यासाठी 'परीसस्पर्श' योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात येणे, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी राज्यात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अनोखा उपक्रम राबविण्यात येणे, राज्याच्या उच्च शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी देशातील व परदेशातील विविध शैक्षणिक संस्था व औद्योगिक संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आले असणे, राज्यातील ३५ विद्यापीठे आणि १९४९ महाविद्यालये अश्या एकूण १९८४ शैक्षणिक संस्थांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन पूर्ण होऊन राज्य देशामध्ये प्रथम क्रमांकावर असणे, मराठीचा माध्यम भाषा म्हणून विकास करण्यासाठी आवश्यक ते संशोधन, परिभाषा निर्मिती, भाषांतर प्रकल्प व अद्ययन सामग्री निर्मितीचे सखोल आकलन याकरिता रिध्दपूर, जि.अमरावती येथे मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यात येणे, ईबीसी, ईडब्ल्यूएस, एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील पात्र विद्यार्थीनींना महाविद्यालयीन शिक्षणशुल्क व परिक्षाशुल्कांच्या संपूर्ण रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याची योजना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करण्यात आली असणे, सार्वजनिक विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जीवन/अपघात विमा योजना लागू करण्यात आली असणे, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये/विद्यापीठांमधील अध्यापकांना 'महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे' यांच्यामार्फत उजळणी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येणे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत 'महाज्ञानदीप' हा क्रांतिकारी डिजिटल ऑनलाईन अभ्यासक्रम उच्चशिक्षणासाठी समर्पित पोर्टल म्हणून विकसित करण्यात आला असणे, उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि तंत्रशिक्षण प्राप्त विद्यार्थ्यांना स्टार्टअप, मेक इन इंडिया आणि महाराष्ट्र स्टार्टअप निधी लागू करण्यात येणे, महा-एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था व उद्योग यांनी डिजिटल प्लॅटफॉर्म निर्माण केला असणे, शासनाच्या संबंधित विभागात लोकप्रतिनिधींना मिळणाऱ्या वागणूकीत अधिक सुधारणा होण्याची आवश्यकता, नवी मुंबईला आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ ५ परदेशातील विद्यापीठे एकत्र येऊन 'एज्युसिटी' निर्माण झाली असणे, परिणामी परदेशातील अभ्यासक्रम भारतातील विद्यार्थ्यांना आपल्या देशातच उपलब्ध होणार असणे, नवीन संच मान्यतेच्या निकषांमुळे राज्यात मोठया प्रमाणात शिक्षकांची पदे अतिरिक्त होणे, राज्यातील सीबीएसई/ आयसीएसई शाळांवर राज्य शासनाचे नियंत्रण आवश्यक असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर चांगले शिक्षण आणि संशोधन व अनुभव मिळण्याकरिता राज्य शासन परदेशीय विद्यापीठांशी भागीदारी वाढविण्याचा प्रयत्न करित

असणे इ. शैक्षणिक धोरणांतर्गत राज्य शासन करित असलेली कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**सर्वश्री. जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. नाना पटोले, अमिन पटेल, अस्लम शेख, सुनिल प्रभू, डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यात दि. ५ व ६ जुलै, २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पावसामुळे मुंबई-पुणे वाहतूक ठप्प होणे, रेल्वे व विमान सेवेवरही परिणाम होणे, मुंबई-गोवा महामार्गावर ८ ठिकाणी दरड कोसळल्याने व सुकेळी खिंडीत आलेल्या पाणलोटाने ३६ तासाहून अधिक काळ वाहतूक ठप्प होणे, मुसळधार पावसाने राज्यातील अंतर्गत रस्ते बाधित झाले असताना प्रमुख महामार्गही बंद झालेले असणे, कोकणात सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण वाहतूक व्यवस्था कोलमडली असून वाहतूक ठप्प झाल्यामुळे कोकणाचा संपर्क तुटणे, हजारो प्रवासी व शेकडो मालवाहू वाहने अडकून पडलेली असणे, या अतिवृष्टीमुळे राज्यात प्राणहानी झाली असून घरांची मोठ्या प्रमाणात हानी होऊन शेकडो लोक बेघर झालेले असणे, तीर्थक्षेत्र आळंदीमधील श्री. संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी व पालखी सोहळ्याला राज्यातून लाखो भाविक व वारकरी आळंदीच्या दिशेने मार्गस्थ झाले असताना अतिवृष्टीमुळे तेथील परिस्थिती चिंताजनक बनलेली असणे, आळंदी येथील नदीला मोठा महापूर आला असून चारही पूल पाण्याखाली गेलेले असणे, कोल्हापूर, सांगली, सातारा येथेही अतिवृष्टी झाल्यामुळे नागरिकांच्या घरांचे झालेले नुकसान, मुंबईत दिनांक ३० जून २०२६ ते ६ जुलै २०२६ या अवघ्या सात दिवसांच्या कालावधीत झालेल्या दुर्घटनांमध्ये १५ नागरिकांचा मृत्यू झाला असणे, ३० जून रोजी चेंबूर येथे झाड कोसळून ११ वर्षीय विहान श्रीवास्तव याचा मृत्यू होणे, २ जुलै रोजी उघड्या मॅनहोलमध्ये पडून ५५ वर्षीय अस्लम शेख यांचा मृत्यू होणे, ४ जुलै रोजी गोरेगाव (पूर्व) येथील आरे कॉलनीत झाड कोसळून १८ वर्षीय युवकाचा मृत्यू होणे, ५ जुलै रोजी कुर्ला (पश्चिम) येथे झाडाची मोठी फांदी दुकानावर कोसळल्याने ६३ वर्षीय युनूस कुंदावाला यांचा मृत्यू होणे, त्याच दिवशी मानखुर्द येथील जनतानगरमध्ये चाळ कोसळून सहा जणांचा मृत्यू होणे, मुंबईतील मालाड दिंडोशी येथील योगेश वर्मा ही व्यक्ती दिनांक ५ जुलै, २०२६ रोजी रात्री नाल्यात पडून वाहून जाणे, कुटूंबियांनी पोलिसांकडे व महानगरपालिकेकडे तक्रारी करुनही याची दखल न घेण्यात येणे, मृत व्यक्तीचा मृतदेह अद्यापही न सापडल्याने स्थानिक जनतेमध्ये पसरलेला असंतोष, ठाणे जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे उल्हास नदी, काळू आणि जांभूळपाडा नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असून नदीकाठावरील गावांना सर्तकतेचा इशारा देण्यात आला असून काही गावकऱ्यांना सुरक्षित स्थळी नेण्यात येणे, या घटनांमुळे पावसाळ्यापूर्वी करण्यात येणाऱ्या सुरक्षात्मक उपाययोजना, धोकादायक झाडांची छाटणी, उघड्या मॅनहोलचे संरक्षण, जीर्ण इमारतींची तपासणी आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही अशा दुर्घटना टाळण्यात प्रशासन अपयशी ठरत असून याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने या सर्व घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आणि मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक व अन्य स्वरुपाची तातडीने मदत करण्याची आवश्यकता, पावसाळी पूर्वतयारी, धोकादायक झाडे, उघडे मॅनहोल, जीर्ण

इमारती आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीचा सर्वंकष आढावा घेऊन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पाटील, सुनिल प्रभू, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री रोहित पवार, अजय चौधरी, अमिन पटेल, उत्तमराव जानकर, दिलीप सोपल, अमित देशमुख, संदिप क्षीरसागर, डॉ.राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, कैलास घाडगे-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री नारायण पाटील, सुनील राऊत, अमित झनक, अभिजीत पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, राजू खरे, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ.बाबासाहेब देशमुख, श्री.हारुन खान, डॉ.ज्योती गायकवाड, सर्वश्री महेश सावंत, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, हेमंत ओगले, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :-**

"दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दुर्देवी निधन होणे, सदरील अपघाताबाबत जनतेच्या मनात साशंकता असून या अपघाताची सर्वंकष व सखोल चौकशी होण्याची होत असलेली मागणी, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर होत असलेला प्रश्न, अपराध रोखण्यात तसेच गुन्ह्याचे अन्वेषण करण्यात गृह विभागाला आलेले अपयश, विरोधी पक्षातील नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे वाढलेले प्रमाण, केंद्रीय गृहमंत्री यांच्याविरुद्ध दिलेल्या घोषणांमुळे करण्यात आलेल्या तडपारीवर सुनावणी दरम्यान पोलिसांच्या कार्यपद्धतीवर मा. उच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे, भंडारा येथे नरेश ईश्वरपूरकर या महाविकास आघाडीच्या भंडारा विधानपरिषद उमेदवाराच्या घरावर निवडणूक कालावधीत १५० पोलिसांसह भंडारा पोलिस अधीक्षक यांनी खोट्या गुन्ह्याच्या अनुषंगाने केलेली बेकायदेशीर कारवाई, सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीत पालकमंत्री व राज्याच्या मंत्र्यांना पोलिसांनी केलेली मारहाण, एकंदरीतच राज्याचा पोलिसांचा उद्दामपणा व दमनकारी वर्तणूक यामध्ये झालेली वाढ, मा.सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरुद्ध बिहार शासन या केसमध्ये दिलेल्या निकालाचे अवमान करणारे पोलिसांचे वर्तन, त्यास तात्काळ पायबंद घालण्याची आवश्यकता, महिला व लहान बालिकांवर होत असलेला अत्याचार व हत्येच्या घटनांमध्ये झालेली वाढ, राज्यात महिला व मुली बेपत्ता होण्याचे वाढलेले प्रमाण, ठाणे जिल्ह्यातील नेतीवली नाका परिसरात एका ७ वर्षीय चिमुरडीवर झालेला सामुहीक अत्याचार, जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथे एका आदिवासी महिलेवर करण्यात आलेला सामुहीक बलात्कार, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात एका अल्पवयीन मुलीवर करण्यात आलेला सामुहिक बलात्कार, त्यामध्ये राजकीय नेत्यांचा असलेला समावेश, सांगली शहर परिसरात झालेल्या गोळीबारात वेदांत बंडगर या बालकाचा झालेला खून, बीड जिल्ह्यातील नुकतेच घडलेले खुनाचे प्रकार यासारख्या घटनांमुळे राज्यातील जनतेमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण,ठाणे पोलिस आयुक्तालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या ६ ते ७ वर्षे न झालेल्या बदल्या, वादग्रस्त पोलिस अधिकारी यांची

महत्वाच्या ठिकाणी होत असलेली नियुक्ती,पोलिसांच्या बदल्यांमध्ये होत असलेले मोठे आर्थिक गैरव्यवहार, राज्यात ड्रग व इतर अंमली पदार्थांची होत असलेली सर्रास विक्री, यामुळे लहान मुलांमध्ये अंमली पदार्थ सेवनाचे वाढलेले प्रमाण, मुंबई लोकलमध्ये किरकोळ वादातून झालेल्या हत्या, राज्याची उपराजधानी असलेले नागपूर हे गुन्हेगारीचे शहर बनत असणे, एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्याने एचडीएफसी बँकेच्या अधिकाऱ्यांबरोबर संगनमत करुन व रस्ते सुरक्षा मोहिम अनधिकृतपणे राबवून ४५ कोटी रुपयांचे निधीची अफरातफर केल्याप्रकरणी एसआयटी स्थापन करण्याची आवश्यकता, मुंबईच्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात झालेल्या ५० कोटी रुपये नुकसानीबाबत व गैरव्यवहाराबाबत पोलिस चौकशी (एसआयटी) करण्याची आवश्यकता, ठाणे येथील रतनशी प्रेमजी ट्रस्टमध्ये पुन्हा घोटाळा झाल्याचे उघडकीस आल्याने या प्रकरणाची पोलिसांकडून गुन्हा दाखल करुन चौकशी करण्याची आवश्यकता, राज्यात अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाची खते आणि बोगस बि-बियाणे शेतक-यांना विकल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द पोलिसांकडे तक्रारी करुनही कारवाई न होणे, राज्यात विविध ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने घातलेल्या धाडींच्या अनुषंगाने पोलिसांकडून करण्यात येत असलेली कार्यवाही, विकासाच्या नावाखाली झालेले काँक्रीटीकरण आणि त्यातील भ्रष्टाचार यामुळे पायाभूत सुविधांची झालेली दुर्दशा, मुंबई, पुणे व अन्य महानगरपालिकेत मोठया प्रमाणात होत असलेला टीडीआरचा घोटाळा, अनेक महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदेमध्ये घनकचरा व्यवस्थापन करताना होत असलेला गैरव्यवहार, राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दरवर्षी रस्ते, पूल, शासकीय इमारती आणि इतर पायाभूत सुविधांवर अनेक ठिकाणी झालेली निकृष्ट दर्जाची कामे, अनियमितता आणि भ्रष्टाचार होत असणे, अनेक रस्ते काही महिन्यांतच उखडणे, मोठमोठे खड्डे पडणे, पुलांमध्ये तडे जाणे किंवा पावसाळ्यात रस्ते वाहून जाणे यामुळे कामांच्या गुणवत्तेवर गंभीर शंका निर्माण होणे,विशेषतः गडचिरोली, चंद्रपूरसह विदर्भ संपूर्ण राज्यातील रस्त्यांची दुरवस्था ही नागरिकांसाठी मोठी समस्या बनली असून दुर्गम आणि आदिवासीबहुल भाग असल्याने रुग्णवाहिका, शालेय वाहने, शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणे, शासनाने जाहीर केलेली "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना", या योजनेमध्ये सन २०१९ च्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ रु.५० हजारपर्यन्त कर्जमाफी देण्याची अट असणे, तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२५-२६ व २०२६-२७ मधील पीककर्ज नियमित भरलेले असण्याची अट असणे, परिणामी लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक ८ जुलै, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक - १ व २)**

**(१) डॉ.मिलिंद नरोटे, सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, संग्राम जगताप, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना संविधानानुसार आरक्षण व विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत असणे, काही व्यक्तींनी ख्रिश्चन धर्मात धर्मांतरण केल्यानंतरही अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र वापरून शासकीय नोकरी, पदोन्नती, निवडणुका तसेच विविध योजनांचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी अनेक जिल्ह्यांतून निदर्शनास येत असणे, यामुळे मूळ घटकातील गरजू लाभार्थ्यांवर मोठा अन्याय होत असणे, मा.सर्वोच्च न्यायालयाने 'सी. सेल्वाराणी विरुद्ध स्पेशल सेक्रेटरी (२०२४)' आणि 'चिंताडा आनंद विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (२०२६)' या प्रकरणांमध्ये याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले असणे, धर्मांतरणानंतरही आरक्षणाचा लाभ घेणे हे बेकायदेशीर असणे, या बाबीची दखल घेऊन शासनाने प्रचलित अधिनियम व नियमांत तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता, त्यामुळे अशा प्रकरणांची विशेष तपासणी मोहीम राबविणे, अपात्र लाभार्थ्यांवर नियमानुसार कारवाई करणे, चुकीच्या पद्धतीने मिळविलेले लाभ परत घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करणे, तसेच भविष्यात अशा प्रकरणांना प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेल दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

**(२) सर्वश्रीमती सरोज अहिरे, देवयानी फरांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक शहर परिसरात प्रस्तावित बाह्य रिंगरोड बाह्य परिक्रमामार्ग हा नाशिक शहराचा विकास, वाहतूक नियोजन तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनाचा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असणे,या प्रकल्पाकरिता देवळाली विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांतील शेतकऱ्यांची सुपीक,सिंचित शेतीयोग्य जमीन संपादनास येत असल्याने शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असणे, सदर शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत जिल्हाधिकारी नाशिक यांनी अमुस, महसूल यांच्याकडे भूमिधारक शेतकऱ्यांच्या मोबदल्याबाबत मार्गदर्शन मागितले असणे, तसेच भूमिधारकांच्या निवेदनानुसार शासनाने (क) जिल्हा प्रादेशिक आराखडा/कृषी/ना-विकास क्षेत्रांतील भूसंपादन अधिकाऱ्यांना गुणांक घटक=२.०० लागू करण्याबाबत परिपत्रकीय निर्देश देणे आवश्यक असणे, नाशिक रिंग रोड प्रकल्पांतर्गत भूसंपादन करताना विहितगाव व लगतच्या परिसरातील जवळपास सर्वच गटांच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात'श्री व्यंकटेश बालाजी मंदिर देवस्थान ट्रस्ट' चे नाव समाविष्ट असल्याचे दिसून येत असणे, या संदर्भात मा. महसूल मंत्री यांनी (प्रकरण क्र.आरटीएस ३०१७/३२७९/प्र.क्र.२४७/ज-६,आदेश दिनांक २३/०६/२०२२) एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला असणे, सदर आदेशानुसार संबंधित देवस्थानला सदर जमिनीची मालकी नसून केवळ जमीन Revenue Grant असल्याचे स्पष्ट करण्यात आले असणे, ट्रस्टला भूसंपादन मोबदल्यात कुठल्याही

प्रकारचा हिस्सा हक्क नसणे, नाशिक रिंगरोड प्रकल्पातील विहितगाव व इतर गावांतील भूसंपादन प्रकरणात RFCTLARR Act,२०१३ नुसार मोबदला फक्त प्रत्यक्ष शेती करणाऱ्या मूळ भूमिधारक शेतकऱ्यांनाच देण्याबाबत तातडीने स्पष्ट निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

**(३) सर्वश्री संजय केळकर, योगेश सागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्यात विविध मार्गांनी प्रवेश करून बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे निदर्शनास येत असणे, तसेच काही प्रकरणांमध्ये वैध व्हिसावर भारतात प्रवेश केलेल्या व्यक्ती व्हिसाची मुदत संपल्यानंतरही देशात वास्तव्यास राहत असल्याचेही आढळून येत असणे, राज्यातील काही महानगर, औद्योगिक क्षेत्रे, झोपडपट्ट्या तसेच संवेदनशील भागांमध्ये अशा व्यक्तींचे वास्तव्य वाढत असल्याबाबत स्थानिक स्तरावर सातत्याने तक्रारी प्राप्त होत असणे, यामुळे कायदा व सुव्यवस्था, नागरी सुविधा, रोजगार, ओळखपत्र व्यवस्थापन, तसेच अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने विविध प्रश्न निर्माण होत असल्याची भावना नागरिकांमध्ये असणे, काही प्रकरणांमध्ये बनावट कागदपत्रे, मानवी तस्करी, अंमली पदार्थ व्यापार, अवैध आर्थिक व्यवहार किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांमध्ये परदेशी नागरिकांचा सहभाग असल्याच्या घटना समोर आलेल्या असणे, त्यामुळे राज्यातील सर्व परदेशी नागरिकांची कायदेशीर स्थिती तपासणे, व्हिसा उल्लंघन करणाऱ्यांची ओळख पटविणे आणि केंद्र शासनाच्या समन्वयाने आवश्यक ती कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका व पुढील उपाययोजना. "

**(४) श्री. विजय शिवतारे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"सन २०१७ साली पुणे मनपामध्ये हवेली तालुक्यातील फुरसुंगी, देवाची उरुळी, उंड्री, पिसोळी, हांडेवाडी, होळकरवाडी, औताडेवाडी, वडाचीवाडीसह, गुजरनिंबाळकरवाडी, भिलारेवाडी, मांगडेवाडी अशी ११ गावे समाविष्ट होणे, येथील नागरिकांना नियमित पिण्याचे पाणी,भूमिगत जलनिस्सारण व्यवस्था,अंतर्गत रस्ते आणि इतर नागरी सुविधा उपलब्ध न होणे, मनपाने या नागरिकांकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा मालमत्ता व अन्य कर वसूल करणे, सेवा न देता करवसुली केली जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष असणे, हजारो कुटुंबांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागणे, मनपात राहूनही ग्रामीण भागापेक्षा निकृष्ट परिस्थितीचा सामना करावा लागणे, खडकवासला धरणातून तातडीने पाणी उपलब्ध होणे शक्य नसणे, त्यामुळे स्थानिक जलस्रोतांवर आधारित दीर्घकालीन पाणीव्यवस्था निर्माण करणेची गरज, मनपा अधिकाऱ्यांशी बैठका घेऊन लोकप्रतिनिधींनी जांभूळवाडी तलाव पाणीयोजना (५२.८३ कोटी), उंड्री पाझरतलाव व १९ पाझर तलावांची एकात्मिक जलसाठा योजना, भिलारवाडी पाझरतलाव आधारित स्वतंत्र योजना अशा तीन महत्त्वपूर्ण योजना प्रस्तावित करणे, नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून

देणे स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य शासनाची मूलभूत जबाबदारी असणे, मनपा आणि राज्य शासनाच्या अनास्थेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरणे, याबाबत तातडीने उच्चस्तरीय बैठका घेऊन कालबद्ध कार्यक्रमाद्वारे या योजना मार्गी लावण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

**(५) सर्वश्री विजयसिंह पंडित, राजेश विटेकर, बबनराव यादव (लोणीकर), सुधीर मुनगंटीवार, नारायण कुचे, अर्जुन खोतकर, नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"घरकुल बांधकामासाठी मोफत वाळू देण्याच्या शासन धोरणाचा गैरफायदा घेऊन राक्षसभुवन, ता.गेवराई येथील गोदावरी नदीपात्रात तहसिलदारांनी विनापरवाना वाळूघाट सुरु करून पदाचा गैरवापर करत शासकीय खनिज संपत्तीची अवाढव्य चोरी, बेकायदेशीर उत्खनन, डिजिटल डाटा चोरी करून सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे, या प्रकरणाची जिल्हाधिकारी, बीड यांचेकडून झालेल्या चौकशीत तहसिलदारांसह इतर दोषी आढळल्यामुळे त्यांचे विरुध्द निलंबनासह शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव शासनाकडे दाखल करणे, या प्रकरणी १७,६६,२२,०९६ रुपये किंमतीच्या २५,६४२ ब्रास वाळू चोरीचा लोकसेवकांसह इतरांविरुध्द चकलांबा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१९९/२०२६ गुन्हा नोंद होणे, आरोपितांमध्ये महसूल व पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश असल्यामुळे अप्पर पोलीस अधिक्षकांच्या नेतृत्वात विशेष एस.आय.टी. नेमून गुन्ह्याचा तपास करण्याची मागणी होणे, या प्रकरणाचा मुख्य सुत्रधार तहसिलदार असतानाही त्याचे विरुध्द गुन्हा नोंद नसल्याने सर्वसामान्यांमध्ये संताप व संशयाची भावना असणे, मंडळ अधिकारी तलवाडा याचे विरुध्द मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन, चोरी केल्याची तक्रार दाखल असणे, गोदावरी नदीपात्रात तहसिलदार व इतरांनी सुमारे १०० कोटी रुपयांचे सिंडीकेट करून अवैध वाळू उत्खनन, विक्री, चोरी केल्याचे चौकशीअंती सिध्द होत असल्याने तहसिलदार, खनिकर्म अधिकारींसह दोषींविरुध्द गुन्हा नोंद करून बडतर्फीची कारवाई करण्यास विलंब होत असल्याने जनतेत शासन विरोधी तिव्र असंतोषाची भावना असणे, या प्रकाराबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(६) श्री.नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे दिव्यांग कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील दिव्यांग व मतिमंद मुलामुलींची शाळा या २००२ पूर्वीच्या असणे, यापैकी १२३ शाळा या अ श्रेणीतील असणे व ३५ शाळा ब श्रेणीतील असणे अश्रेणीतील १२३ शाळांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार शंभर टक्के अनुदान देण्याचे ठरविण्यात आलेअसणे पण दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार पद मान्यता व ५० टक्के शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येत असणे, मागील दहा वर्षापासून हे सर्व कर्मचारी ५०% अनुदानावरती काम करीत असणे, मागील अनेक वर्षांपासून या १२३ शाळेतील कर्मचारी हे शंभर टक्के अनुदानाची मागणी करीत असणे, शासनाच्या निर्देशानुसार या सर्व १२३ शाळांची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदांमार्फत अनेकदा तपासणी करणे,

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांच्याद्वारे आयुक्तालयास वारंवार अहवाल सादर करण्यात आलेला असणे, अहवालावरती राज्यस्तरीय समिती तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, सुमारे ९०% शाळांची राज्यस्तरीय तपासणी समितीद्वारे तपासणी करून अहवाल शासनास सादर करण्यात आलेला असणे, शासनाद्वारे यासंदर्भात कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, यासंदर्भात २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी उपस्थित केलेली असणे, यासंदर्भात तत्कालीन मंत्री यांनी या सर्व "अ" श्रेणीतील १२३ व ब श्रेणीतील ३५ शाळांना तीन महिन्याच्या आत अनुदान तत्त्वावर आणण्याकरिता तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, पण अद्याप पर्यंत शासनाकडून कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, यावरून असे निदर्शनास येते की आयुक्त व शासन यांच्याकडून "अ" श्रेणीतील १२३ व ब श्रेणीतील ३५ शाळा यांना १०० टक्के अनुदानावर आणण्याकरिता उचित कार्यवाही होत नसणे, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२६ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री.सुनिल राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडमधील कचऱ्यातून मिथेन वायू उत्सर्जित होत असल्याचे युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, लॉस एंजेलिस यांच्या अभ्यासावर आधारित अहवालांतून निदर्शनास येणे, मिथेन वायू हवामानासाठी अत्यंत धोकादायक असल्यामुळे होणारे प्रदुषण आणि दुर्गंधीमुळे डम्पिंग ग्राऊंड परिसरातील कन्नमवार नगर, विक्रोळी, कांजुरमार्ग, टागोर नगर, मुलूंड परिसरातील १५ लाखांहून अधिक रहिवाश्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणे, या परिसरातील नागरीकांना श्वसनाच्या त्रासासह अनेक आजारांना सामोरे जावे लागणे, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या एका याचिकेवर मा.न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त करणे, डम्पिंगसाठी विशेष प्रदूषण पातळी दर्शवणारा डिसप्ले बोर्ड तज्ज्ञांच्या आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या समन्वयाने एका महिन्यात बसवण्याचे निर्देश मा.न्यायालयाने संबंधित प्राधिकरणाला माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान मा.न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, तसेच डम्पिंग ग्राऊंडमध्ये मध्यरात्री १ ते सकाळी ६ यावेळत दुर्गंधीचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास येणे, वैद्यानिक कारणे आणि तज्ज्ञांचे मत जाणून घेऊन कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडमधील वाढते प्रदुषण व दुर्गंधीवर नियंत्रण आणण्यासाठी सक्षम उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.निलेश राणे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"सिंधुदुर्ग जिल्ह्यात गोवा बनावटीची अवैध दारू तस्करी, अंमली पदार्थांचा वाढता विळखा, बेकायदा गोमांस विक्री आणि गो-तस्करी यांसारख्या बेकायदेशीर धंद्यांच्या विळख्यात संपूर्ण जिल्हा सापडणे, सदर अवैध धंदे करणाऱ्या गुन्हेगारांना स्थानिक पोलिसांचेच अभय लाभत असल्याचा आरोप होत असणे, जिल्ह्यात वारंवार अवैध दारू पकडली जात असतानाही पोलीस अधीक्षकांच्या कार्यकाळात अद्याप एकही मोठी कारवाई झाली नसल्याने आजही विशिष्ट वाहनांद्वारे गोव्यातून राजरोसपणे दारू वाहतूक सुरू असणे, तसेच ड्रग्ज व गांजा पुरवठ्याचे मुख्य सूत्रधार पकडण्यास पोलिसांना पूर्णपणे अपयश येणे, अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, दोडामार्ग तालुक्यात रबर शेतीच्या नावाखाली सुमारे १८०० हेक्टर क्षेत्र गांजाच्या बेकायदेशीर लागवडीखाली येत असतानाही पोलिसांकडून कोणतीही विशेष मोहीम किंवा कारवाई करण्यात न येणे, जिल्ह्यातील या अवैध धंद्यांकडून कथित हप्ते गोळा केले जात असल्याचे समोर येणे, गुन्हेगारांना पोलिसांकडूनच मिळणाऱ्या अभयामुळे जिल्ह्याची सुरक्षा धोक्यात येणे, शासनाच्या याकडे होत असलेल्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून युवा पिढीचे भवितव्य अंधारमय होणे, या परिस्थितीची दखल घेऊन जिल्ह्यातील गुन्हेगारी व अमली पदार्थांच्या विळख्याला आळा घालण्यासाठी ठोस कार्यवाही करणे, गुन्हेगारीस सहकार्य करणाऱ्या व हप्तेखोरी करणाऱ्या दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरात विशेषत: बोरीवली परिसरात अंमली पदार्थांचे वाढत असलेले प्रमाण, विविध भागात ड्रग्स, मद्यपान करणे, सिगारेट व इतर अंमली पदार्थांची विक्री खुले आम होत असल्याच्या तक्रारी नागरीकांकडून सातत्याने होत असणे, ही परिस्थिती केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नसून समाजाच्या नैतिक व सामाजिक आरोग्याशी निगडीत असणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात फळे, मिठाई, मिंट इत्यादी फ्लेवरयुक्त वेप उत्पादने लहान मुलांना आकर्षित करणे, तसेच ई-सिगारेटची (वेप) अवैध खुलेआम विक्री होत असल्याने विशेषत: शालेय/कॉलेजचे विद्यार्थी याच्या विळख्यात अडकणे, त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक वातावरणावर, कुटुंबव्यवस्थेवर तसेच समाजातील सुरक्षिततेवर याचा परिणाम होणे, या संदर्भात प्रशासनाकडे माहिती असतानाही अपेक्षित कार्यवाही न झाल्यामुळे नागरीकांच्या मनात खंत व्यक्त होणे, झेपटो, ब्लिंकइट यांसारख्या ऑनलाईन वितरण प्रणालीव्दारे अंमली पदार्थ सेवनासाठी वापरले जाणारे विविध साहित्य सहज उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे नागरीकांकडून ऑनलाईन विक्री करण्यास बंदी घालण्याची होत असलेली मागणी, मुंबई क्राईम ब्रँचने सन २०२५ मध्ये दहीसर, सांताक्रुझ, कालबादेवी, कम्बाला हिल इत्यादी ठिकाणी चीनमधून तस्करी केलेल्या रुपये ३२ लाखांच्या

ई-सिगारेट मुद्दे मालासह जप्त करणे, मुंबईसह राज्यभरातील शाळा-कॉलेजांच्या ५०० मीटर परिसरात व सार्वजनिक ठिकाणी विशेष तपासणी मोहिम राबवून अवैध विक्री करणाऱ्या दुकानांवर, पुरवठादारांवर व ऑनलाईन विक्रेत्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, डब्ल्यू/सीडीसी डेटा व चीन तस्करीच्या धोक्यावर आधारीत व्याख्याने, सोशल मिडीया अभियानाव्दारे शालेय/कॉलेजच्या विद्यार्थी/पालक तसेच जनतेमध्ये जन-जागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री.अमिन पटेल, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"दक्षिण मुंबईमध्ये प्रचंड प्रमाणात पाण्याची कमतरता भासणे, या विभागात जुन्या व जीर्ण इमारती असल्याने या इमारतीच्या गच्चीवर अथवा भूमिगत पाण्याच्या टाक्या नसणे, जुन्या झालेल्या पाण्याच्या पाईप लाईन बदलून तेथे नवीन पाईप लाईन टाकण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे ११० मिलियन लिटर पाणी दर दिवशी मिळणे आवश्यक असताना आजमितीस ९० ते ९५ मिलियन लिटर पाणी दक्षिण मुंबईतील नागरीकांना उपलब्ध करण्यात येणे, दक्षिण मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या भंडारवाडा जलाशयातून प्रतिदिन ११० एमएलटी पाणी पुरवठा करण्याबाबत सुमारे २५ वर्षापूर्वी निर्णय करण्यात येणे, त्याचप्रमाणे पाण्याच्या प्रवाहाचा दाब किमान आठ अंशापर्यंत असण्याची आवश्यकता, सकाळी चार ते सहा या दरम्यान पाणी पुरवठा होणे, या दोन तासाच्या अवधीत सुरुवातीला अर्धा तास दुषित पाणी येत असल्याने ते पाणी वाया जात असणे, त्यानंतर उरलेल्या दीड तासात पाण्याचा दाब कमी असल्याने पाण्याचा वापर व साठा करताना नागरीकांची विशेषतः महिलांची खूप तारांबळ होणे, भंडारवाडा जलाशयातून दक्षिण मुंबईमध्ये अनेक विभागात पाणी पुरवठा करण्यात येणे, त्याठिकाणी आजमितीस पुनर्विकासाची कामे सुरु असणे किंवा पूर्ण झालेली असणे, भविष्यात होणारे पुनर्विकासाचे प्रकल्प लक्षात घेता भंडारवाडा जलाशयाच्या पाणी पुरवठ्याची पातळी वाढवण्याची आवश्यकता, दक्षिण मुंबई मध्ये होणारा पाणीपुरवठा कमी दाबाचा व अपुरा असल्याने तो सुरळीत करण्यात येण्याची स्थानिक नागरीकांची होत असलेली मागणी, परिणामी समाजात पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(५) श्री.रणधीर सावरकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात राष्ट्रसंत विनोबाजी भावे यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्रात सुमारे १९ गावांमध्ये ग्रामदान अधिनियम १९६४ अंतर्गत ग्राममंडळाची स्थापना होणे, ग्राममंडळाच्या प्रचलित अधिनियमानुसार या गावांतील शेतकऱ्याच्या जमिनीला वर्ग-२ दर्जा दिला गेल्यामुळे शासनाच्या प्रचलित योजनांच्या सवलती/फायदा घेण्यात अडचणी येणे, शेतीला अकृषक करण्याची परवानगी न मिळणे, ॲग्री स्टॅक मध्ये नोंदणी न होणे, ई पिक, पिक विमा, पिक कर्ज, गहाण कर्ज, पिकविमा, आदि प्रकरणांमध्ये अडचणी येणे, राष्ट्रीयकृत बँकांमधून शेती कर्ज नाकारण्यात येणे, शेतीवर वाणिज्य विषयक

व्यवसाय सुरु करण्यास बाधा येणे, सदर ग्रामदान अधिनियम १९६४ चा कायदा रद्द करुन या ग्राममंडळांचे प्रचिलित ग्रामपंचायत कायद्यात विलिनीकरण करण्याची ग्राममंडळांची होत असलेली मागणी, या संदर्भातने शासन निर्णय क्र. जमीन २०१६/प्र.क्र. १००/ज- १ दि. २३ मार्च, २०१६ अन्वये गठित अभ्यास समितीचा अहवाल शासनास अद्याप सादर न होणे, मा. महसूलमंत्री यांनी संबंधिताची बैठक घेऊन सुद्धा अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ८ जुलै, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.